डॉ. सुनंदा व सुभाष रानडे फाउंडेशन तर्फे पारितोषिक प्राप्त लेख

# अभयारिष्ट

वैद्य सागर मगर

हरीतकीनां प्रस्थार्धं प्रस्थमामलकस्य च ।

स्यात् कपित्थाद्दशपलं ततोऽर्धा चेन्द्रवारुणी ॥138॥

विडंग पिप्पली लोध्रं मरिचं सैलवालुकम् ।

द्विपलांशं जलस्यैतच्चतुर्द्रोणे विपाचयेत् ॥139॥

द्रोणशेषे रसे तस्मिन् पूते शीते समावपेत् ।

गुडस्य द्विशतं तिष्ठेत्तत् पक्षं घृतभाजने ॥140॥

पक्षादूर्ध्वं भवेत् पेया ततो मात्रा यथाबलम् ।

अस्याभ्यासादरिष्टस्य गुदजा यान्ति संक्षयम् ॥141॥

ग्रहणीपाण्डुहृद्रोगप्लीहगुल्मोदरापहः ।

कुष्ठशोफारुचिहरो बलवर्णाग्निवर्धनः ॥142॥

सिद्धोऽयमभयारिष्टः कामलाश्वित्रनाशनः ।

कृमिग्रन्थ्यर्बुदव्यंगराजयक्ष्मज्वरान्तकृत् ॥143॥ इत्यभयारिष्टः ।

कल्प नाम : अभयारिष्ट

संदर्भ : च. चि. 14 अर्श चिकित्सा,

अन्यग्रंथ संदर्भ : सु. चि.6/15, अ. हृ. चि. 8/64

अधिकरण : शुष्कार्श

घटकद्रव्ये :

| | रस | विपाक | वीर्य | गुण | दोषघ्नता | अन्यकर्म |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| हरीतकी | कषायप्रधान पंचरस अलवण) | मधुर | उष्ण | लघु, रुक्ष, हृद्य | त्रिदोषघ्न | दीपन, बृहण, अनुलोमन, अर्श, कुष्ठ, शोथ, उदर, कृमि, ग्रहणी, विबंध, विषमज्वर,गुल्म, हृदामय, कामला, प्लीहा |
| आमलकी | अम्लप्रधान पंचरस अलवण) | मधुर | शीत | रुक्ष, गुरु | त्रिदोषघ्न | रुचिकर |
| कपित्थ | अम्ल, कषाय | अम्ल | | गुरु | वातपित्तघ्न | तृषाहिक्काशमन, रुचिकर |
| इंद्रवारुणी | तिक्त | कटु | उष्ण | सर, लघु, रुक्ष, तीक्ष्ण | पित्तकफहर | कामला, प्लीहा, उदर, कुष्ठ, गुल्म, ग्रंथि, आमदोष, विष, सर्व उदरनाशक, रेचन |
| विडंग | कटु | कटु | उष्ण | तीक्ष्ण, रुक्ष, लघु | कफहर | कृमिघ्न, दीपन, उदर, कृमि, वातरोग, विबंध |
| पिप्पली | कटु | मधुर | अनुष्ण | स्निग्ध, लघु, तीक्ष्ण | वातकफहर | दीपन, रेचन, उदर, ज्वर, कुष्ठ, गुल्म, अर्श, प्लीहा, वातरोग |
| लोध्र | कषाय | कटु | शीत | लघु, ग्राही, रुक्ष | कफपित्तहर | ज्वर, शोथ |
| मरिच | कटु | कटु | उष्ण | तीक्ष्ण, रुक्ष, लघु | कफवातहर, पित्तकर | दीपन, शूल, कृमि |
| एलवालुक | कषाय | कटु | शीत | लघु | कफहर | अरुचि, हृद्रोग, कुष्ठ, कृमि |

रस विपाक वीर्य गुण दोषघ्नता अन्यकर्म

हरीतकी कषायप्रधान पंचरस अलवण) मधुर उष्ण लघु, रुक्ष, हृद्य त्रिदोषघ्न दीपन, बृहण, अनुलोमन, अर्श, कुष्ठ, शोथ, उदर, कृमि, ग्रहणी, विबंध, विषमज्वर,गुल्म, हृदामय, कामला, प्लीहा

आमलकी अम्लप्रधान पंचरस अलवण) मधुर शीत रुक्ष, गुरु त्रिदोषघ्न रुचिकर

कपित्थ अम्ल, कषाय अम्ल गुरु वातपित्तघ्न तृषाहिक्काशमन, रुचिकर

इंद्रवारुणी तिक्त कटु उष्ण सर, लघु, रुक्ष, तीक्ष्ण पित्तकफहर कामला, प्लीहा, उदर, कुष्ठ, गुल्म, ग्रंथि, आमदोष, विष, सर्व उदरनाशक, रेचन

विडंग कटु कटु उष्ण तीक्ष्ण, रुक्ष, लघु कफहर कृमिघ्न, दीपन, उदर, कृमि, वातरोग, विबंध

पिप्पली कटु मधुर अनुष्ण स्निग्ध, लघु, तीक्ष्ण वातकफहर दीपन, रेचन, उदर, ज्वर, कुष्ठ, गुल्म, अर्श, प्लीहा, वातरोग

लोध्र कषाय कटु शीत लघु, ग्राही, रुक्ष कफपित्तहर ज्वर, शोथ

मरिच कटु कटु उष्ण तीक्ष्ण, रुक्ष, लघु कफवातहर, पित्तकर दीपन, शूल, कृमि

एलवालुक कषाय कटु शीत लघु कफहर अरुचि, हृद्रोग, कुष्ठ, कृमि

गुड : गुरु, स्निग्ध, नातिपित्तहर, कफवर्धक, मेदकृमिबलवर्धक

निर्माणविधि : निरस्थि हरीतकी 1/2 प्रस्थ = 8 पल (320 सा), निरस्थि आमलकी 1 प्रस्थ = 16 पल (640 सा), कपित्थ 10 पल(400 सा), इंद्रवारुणी 5 पल (200 सा), विडंग, पिप्पली, लोध्र, मरिच, एलवालुक = प्रत्येकी 2 पल (80 सा)

1) क्वाथ : वरील द्रव्य + 8 द्रोण जल (2048 पल) 2 द्रोण (512 पल) (81.92 श्रळीं) द्वगुण्य नियमाने (20.48 श्रळीं)

2) क्वाथ गाळण, थंडझाल्यावर (पुते शीते) रवव गुड (200 पल) स्थापयेत् घृतभाजने धातकीपुष्प 1 प्रस्थ (वा) (घृत लावलेल्या भांड्यात ठेवणे)

कपड्डमिट्टि करुन मुखसंधि बंद करणे. धान्यामध्ये 15 दि ठेवणे. नंतर गाळून घेऊन पानार्थ वापरावे.

मात्रा : ....ततो मात्रां यथाबलम्

काल : प्रात: (सु.)

प्रात:/अन्नकाले (आहारकाली) - अ.सं.

कल्पनाविशेष : अरिष्ट गुणधर्म -

शोषार्शोग्रहणीदोषपाण्डुरोगारुचिज्वरान् । (च.सू. 27)

शूलाध्मानोदरप्लीहज्वराजीर्णार्शसां हित: ॥ सु. सू. 45

दीपन, पाचन, लघु, सुक्ष्म, उष्ण, तीक्ष्ण, कफवातघ्न, पित्ताविरोधि

मन: शरीराग्निबलप्रदानामस्वप्नशोकारुचिनाशनानाम् ।

(च.सू.25)

संधानकल्पना मनावर कार्य करते, शरीर व अग्निबल वाढवते, अरुचिनाश करतात.

अवस्था - विड्वातसंगे पयसा रसैर्वा प्राग्भक्तमद्यादुरुबूकतैलम् । स्रोतोविबन्धेऽग्निरुचिप्रणाशे मद्यान्यरिष्टांश्च पिबेत् सुजातान् ॥

च.चि.12/28

शोथ चिकित्सामध्ये अरिष्ट वर्णन करण्यापूर्वी ही अरिष्टची सामान्य अवस्था सांगितली आहे, यानुसार वरील शोष, अर्श, ग्रहणी, पांडु ,ज्वर, आध्मान, उदर, प्लीहा, अजीर्ण इ. व्याधींमध्ये अग्निमांद्य, स्रोतोरोध, अरुचि, वातवर्च अवरोध ही समान अवस्था असता अरिष्टकल्पना शमनार्थ/संप्राप्तीमधील त्या अवस्थेचा भेद करण्यासाठी/अनुपान म्हणुन वापरता येईल. दुसरा समान घटक म्हणजे अग्निमांद्य/स्रोतोरोधजन्य संप्राप्ती असताना अरिष्ट कल्पना वापरावी. अरिष्ट कल्पनेद्वारे अग्निचे बल वाढुन तो अधिक कालापर्यंत स्थिर राहतो.

फलश्रुति :

अस्याभ्यासादरिष्टस्य गुदजा यान्ति संक्षयम् ॥141॥

ग्रहणीपाण्डुहृद्रोगप्लीहगुल्मोदरापह: ।

कुष्ठशोफारुचिहरो बलवर्णाग्निवर्धन: ॥142॥

सिद्धोऽयमभयारिष्ट: कामलाश्वित्रनाशन: ॥

कृमिग्रन्थ्यर्बुदव्यंगराजयक्ष्मज्वरान्तकृत् ॥ 143॥

इत्यभयारिष्ट: ।

(च.चि.14)

1) अर्श - अस्याभ्यासादरिष्टस्य गुदजा यान्ति संक्षयम्

अर्श हा जीर्णदोष, लीनदोष असणारा व्याधी असल्याने चिकित्सा अभ्यासात म्हणजे अधिक दिवस सेवन करावे लागते. अभयारिष्ट शुष्कार्शातील (वातकफज) कल्प आहे. शुष्कार्शमध्ये वातकफाच्या शीत गुणाने स्तंभ, कफामुळे कंडु, कफाने वात मार्गावरोध झाल्यास रुजा शोफ ही लक्षणे असतात. त्यामुळे शुष्कार्शमध्ये उष्ण कफवातघ्न उपचार अपेक्षित गुदजा म्हणजे अर्श, गुदाश्रित दोष हरण करुन गुदवली वरील दोषावरण कमी झाल्याने अर्शचा क्षय होतो, उष्ण रुक्षण लेखन गुणाने कफाचे शोषण होत असल्याने मांसांकुर कमी होतात. अभयारिष्ट शुष्कार्श (वातकफज) मध्ये वातकफहर कार्य करते. हेतुप्रत्यनिक (वातज व कफज अर्श हेतुंच्या विरुद्ध गुणाचे उष्ण, तीक्ष्ण, लघु, दीपन असल्याने) व व्याधिप्रत्यनिक म्हणून अधिक दिवस सेवन करावे. अर्श व्याधीमध्ये मंदाग्नी व त्रिदोषप्रकोप(वातप्रधान), गुदमार्गावरोध अपानवायु प्रतिलोम,मलसंचय होणे हे महत्त्वाचे संप्राप्तीघटक आहेत. त्यामुळे अर्शामध्ये वातानुलोमन करणारे व अग्निचे बल वाढवणारे आहार,पानद्रव्य व औषधींचे नित्य सेवन करावे.

यद्वायोरानुलोम्याय यदग्निबलवृद्धये ।

अन्नपानौषधद्रव्यं तत् सेव्यं नित्यमर्शसै: ॥247॥

अभयारिष्ट हे उष्ण, अम्लरसप्रधान कल्प आहे , यातील बहुतांश द्रव्य अग्निदीपन करणारे व हरितकी, आमलकी इ. द्रव्य उत्तम वातानुलोमन करणारे, शूलघ्न आहेत. हरितकी हे मला मुळे आलेला विबंध दुर करुन मलानुलोमन करते.

अभयारिष्टमधील अर्श पूर्वरुपावस्थामध्ये - वातवर्च अनुलोमन व अग्निदीपन करुन संप्राप्तीभंग करण्यासाठी अभयारिष्ट हे इतर औषधांसह अनुपान म्हणून वापरावे .

विष्टम्भोऽन्नस्य दौर्बल्यं कुक्षेराटोप एव च ।

कार्श्यमुद्गारबाहुल्यं सक्थिसादोऽल्पविट्कता ॥

ग्रहणीदोषपाण्ड्वर्तेराशंका चोदरस्य च ।”

(च.चि.14/22)

अनुपानं भिषग्दद्याद्वातवर्चोऽनुलोमनम् ॥129॥

अर्श स्थानसंश्रय त्वक,मांस,मेद याकडे गामित्व.

वा. उदावर्तनामक उपद्रव

(नि. 7/46)

गंडशोथ, अरुचि, ज्वर, हृद्रोग, ग्रहणी, गुल्म, उदर, मनोविकार

(पवनस्योर्ध्वगामित्वमुळे) कोष्ठगत वातदुष्टी यामध्ये उपयोगी.

2) ग्रहणी - अर्शानंतर ग्रहणीदुष्टी/ग्रहणी नंतर अर्श झाल्यास

त्रयो विकारा: प्रायेण ये परस्परहेतव: ।

अर्शांसि चातिसारश्च ग्रहणीदोष एव च ॥

....तस्मादग्निबलं रक्ष्यमेषु त्रिषु विशेषत: ॥

(च.चि. 14)

ग्रहणी हेतु व संप्राप्ती पाहता - दुष्यत्यग्नि: स दुष्टोऽन्नं न तत् पचति लघ्वपि।

प्रधानत: अग्निदुष्टी व वातदुष्टी(समानवायु) होते व त्यामुळे लघु व अल्प आहार देखील पचन होत नाही. ही संप्राप्ती ग्रहणीश्रित होत असल्याने ग्रहणी व्याधी उत्पन्न होतो. अभयारिष्ट ग्रहणीची ही संप्राप्तीभंग (विशेषत: मंदाग्नी असताना) करेल.

ग्रहणीपूर्वरुप अवस्थेत अग्निचे कार्य सुधारुन, बलवर्धन करेल.

कफज ग्रहणी - कफज ग्रहणीमध्ये गुरु,अतिस्निग्ध,शीत पदार्थसेवनाने अग्निदुष्टी होते. या हेतुंनी अग्निदुष्टी झाल्यास लघु,रुक्ष,उष्ण,तीक्ष्ण गुणाचे अरिष्ट वापरावे. तसेच सर्वप्रथम रुक्ष,व अग्निवर्धक चिकित्सा करायला सांगितली आहे. तसेच वमनादि शुद्धि नंतर देखील दीपनार्थ सुरा, आसव, अरिष्टचा प्रयोग. याठिकाणी अभयारिष्टपेक्षा त्या त्या रोगाधिकारातील अरिष्ट वापरावे (?).

3) पांडु - अर्श चा उपद्रव म्हणून पांडु झाल्यास

दोष / दुष्य / स्थान साम्य (अर्श , पांडु) - त्रिदोष, त्वक, मांस, रक्त  विरुद्ध, असात्म्य भोजन, माषपिण्याकतिल इ कफवर्धक अभिष्यंदी आहारहेतु व चिंताभयक्रोधशोक इ मानस हेतुने पित्तप्रधान

त्रिदोषप्रकोप होऊन धातुंपर्यंत जाऊन धातुशैथिल्य करतात.  अभयारिष्ट हेतुप्रत्यनिक कार्य, धातुशैथिल्य दुर करण्याचे कार्य करते. (?) मृदभक्षणजन्य पांडु मध्ये अग्निमांद्य होऊन बलवर्णाग्निनाश झाला असता अभयारिष्ट दीपन कार्य करुन तदाश्रित बलवर्ण वाढवेल.  रक्तवह स्रोतस दुष्टी लक्षण

4) हृद्रोग - हृद्रोग चे मानस हेतु विरुद्ध कार्य (चिंता,भय)

हृद्रोग मधील वैवर्ण्य, अरुचि, रुजा,कफोत्क्लेश हे लक्षण कमी करते, कफज हृद्रोग - तीक्ष्ण अन्नपान सांगितले, अरिष्ट कल्पना तीक्ष्ण, उष्ण असल्याने उपयोगी

5) प्लीहा - प्लीहोदर  वातप्रकोपक हेतुने प्लीहावृद्धी झाल्यास, अरुचि,दौर्बल्य,वर्चग्रह,मृदुज्वर,अग्निनाश, कोष्ठामध्ये वातजन्य शूल असताना उपयोगी  वातज प्लीहोदर मध्ये उदावर्त,रुजा, आनाह असताना वातनुलोमन कार्य, ग्रहणी, अर्श व्याधीतील क्षार, अरिष्ट वापरण्याचा उल्लेख  वातकफोल्बण प्लीहोदर- वातकफशमन  दुष्य रक्त, रक्तवह स्रोतस दुष्टी लक्षण

6) गुल्म - त्रिदोष प्रकोप (प्रमुखत: वात)

संप्राप्ती : कर्शनात्कफविट्पितैर्मार्गस्यावरणेन वा ।

वायु: कृताश्रय: कोष्ठे रौक्ष्यात्.........॥

(वा.नि.11/39)

कफादि कुपित दोषामुळे वायुचा मार्गावरोध होतो व कोष्ठामध्ये प्रवेश करुन गुल्म उत्पत्ती. अभयारिष्ट कफ, विट यांमुळे आलेला, वायुच्या मार्गातील अवरोध दुर करते.

कफज गुल्म - अरिष्ट प्रयोग उल्लेख

मंदेऽग्नावरुचौ सात्म्यैर्मद्यै: सस्नेहमश्नताम् ।

योजयेदासवारिष्टान्निगदान् मार्गशुद्धये ।

वा.चि.14/108

अभयाअरिष्ट गुरु,शीत,स्निग्धहेतुंविरुद्ध कार्य करुन उष्ण, तीक्ष्ण, सर, सुक्ष्म गुणाने कफाने आलेला अवरोध दुर करेल. दोषसंघाताचे विलयन करुन अधोमार्गाने दोषांचे शोधन करते, तसेच दीपन व रुचिकर असल्याने कफज गुल्मात उपयोगी.

रक्तवह स्रोतस दुष्टी लक्षण

7) उदर - उदराण्युपजायते मंदाग्नीनां विशेषत: ।

उदर चि करताना सर्व उदर मध्ये दीपन चिकित्सा, तसेच अनुलोमक व वातघ्न चिकित्सा करण्यास सांगितले अरिष्ट पथ्यकर सांगितले.

बद्धगुदोदर : अर्श व्याधीची चिकित्सा न केल्यास गुदावरोध होऊन प्रकुपित अपानवायु अग्निमांद्य ,उदरभागी दोषसंचय,मल,कफ,पित्त चा अवरोध करतो व बद्धगुदोदर उत्पन्न करतो. उष्ण, तीक्ष्ण गुणाने अग्निवर्धन व अनुलोमन करुन दोषांमुळे (वात, कफ, मल) आलेला अवरोध कमी करेल. ज्वर, दौर्बल्य, वर्चसंग इ लक्षणे कमी करते. वातानुलोमन करुन उदरातील प्राण, अपान वायु दुष्टी कमी करेल. अर्श, ग्रहणी व्याधीची चिकित्सा न केल्यामुळे/त्यामुळे कर्शन उदर व्याधी झाल्यास अभयारिष्ट उपयोगी

वातोदरमध्ये : वातप्रकोप होऊन कुक्षिहृदबस्तिगुद याठिकाणी जातो व अग्निहानी करतो. कुक्षिपाणिपादवृषणश्वयथु, दौर्बल्य, अरुचि, वातवर्चमूत्रसंग ही लक्षणे असताना दीपन, वातवर्चानुलोमन, रुचिकर, शोथहर कार्य

कफज उदर : मधुर, अतिस्निग्ध, पिच्छिल, दधि इ. हेतु

अरुचि, पाणिपादमुष्कोदर शोफ शोधनोत्तर दीपनार्थ अरिष्टप्रयोग स्तैमित्य, अरुचि, हृल्लास, मंदाग्नि असताना कफविलयनार्थ अरिष्ट प्रयोग पांडुप्रमाणे त्वकमांसांतर दोषसंचय. अभयारिष्टचे गामीत्व त्वक, मांसाकडे असल्याने व हरितकी,आमलकी सारखे द्रव्य रुक्षण गुणाने द्रवधातुचे(विकृत अन्नरस) शोषण करुन हा दोषसंचय दुर करेल

8) कुष्ठ - हेतु विरुद्धान्नपान, गुरु, स्निग्ध, द्रव, पिष्टान्न, दधि, मत्स्य, इ.च्या विरुद्ध रुक्ष, लघु, उष्ण, गुणाने कार्य विरेचन द्रव्याचे सहपान म्हणून आसव, सीधू उपयोग (च.चि.7/44), अभयारिष्ट अधोमार्गाने दोषहरण करेल. कुष्ठातील सप्तको द्रव्यसंग्रह पैकी त्रिदोष, रक्त, मांस, त्वक वर अभयारिष्ट चे कार्य
दोष/दुष्य/स्थान साम्य (अर्श, कुष्ठ) - त्रिदोष, त्वक, मांस, रक्त रक्तवह स्रोतस दुष्टी लक्षण

9) शोफ - वातजकफज अर्शमध्ये शोफ असताना असाध्य अर्शमध्ये हस्तपादमुखनाभीगुदवृषण शोथ असताना पण याप्य प्रत्याख्येय अवस्थेत याप्य : शेषत्वादायुष (आयुष्य शिल्लक असलेला रोगी), चतुष्पादसमन्वित, दीप्तकायाग्नि सहजार्श पाणिपादवदनाक्षिकुट कफज शोथ मध्ये उष्ण औषधी, आसव वापरण्याचा उल्लेख आहे. अभयारिष्ट वातानुलोमन, कफघ्न कार्य करुन कफामुळे आलेला वायुच्या मार्गातील अवरोध दुर करेल. यासोबतच शोथातील अरिष्टची सामान्य अवस्था (वर सांगितली आहे) असताना. रसवह स्रोतस दुष्टी लक्षण

10) अरुचि -   अरुचि अग्नि, जिव्हा, हृदय आश्रित    दोषज व मानस अरुचि   दोषज अरुचिमध्ये दीपन पाचन चिकित्सा करण्यासाठी अभयारिष्ट उपयोगी   सुरामाध्वीक, सीधु कवलधारण करण्यास सांगितले आहे, जिव्हास्थित दोषांचे पाचन करेल? तसेच अभयारिष्ट हे उष्णगुणाने आमाशयास्थ दोषपाचन, अम्ल रस, विपाकाने रुचिकर, दीपन कार्य करते.   अरिष्ट : मानसहेतुंवर कार्य   वातकफज अर्शात अरुचि लक्षण असताना उपयोगी.   रसवह स्रोतस, अन्नवह स्रोतस दुष्टी लक्षण

11) बलवर्णाग्निवर्धन - अभयारिष्ट दीपन कार्य करुन अग्निवर्धन करते. अग्नि प्राकृत झाल्यास विशेषत: अग्निदुष्टीमुळे झालेली बलहानी व वर्णनाश दुर होतो.   बल व वर्ण हे जाठराग्निस्थित आहेत. (चक्र.)

12) कामला - शाखाश्रित कामला मध्ये शीत,गुरु,मधुर हेतुंनी झालेली कफदुष्टी उष्ण, तीक्ष्ण, रोचक गुणाने वातकफशमन, अग्निवर्धन करुन अभयारिष्टाने दुर होऊन दौर्बल्य, अल्पाग्नि, अरुचि,ज्वर इ. लक्षणे कमी करण्यास मदत होते   हलीमक मध्ये बलक्षय, मंदाग्नि, मृदुज्वर, अरुचि, इ. लक्षणे असतात, यामध्ये अग्निवर्धनार्थ अरिष्ट प्रयोग करण्याचा उल्लेख आहे.   दुष्य/स्थान साम्य (अर्श, कामला) - त्वक, मांस, रक्त रक्तवह स्रोतस दुष्टी लक्षण

13) श्वित्र -   मेदाश्रित, मांसश्रित व रक्ताश्रित श्वित्र वर उपयोगी

दोष/दुष्य/स्थान साम्य (अर्श, कुष्ठ) - त्रिदोषप्रकोप, त्वक,मांस,रक्त (अभयारिष्टचे गामीत्व)   रक्तवह स्रोतस दुष्टी लक्षण

14) कृमिरोग -   आभ्यंतर कृमि : अजीर्ण, अग्निमांद्यजनित हेतु व त्रिदोष प्रकोप   अभयारिष्ट मधील हरितकी, आमलकी, विडंग, मरिच, एलवालुक इ. द्रव्य कृमिघ्न आहेत. विशेषत: पुरीषज व कफज कृमि मध्ये अभयारिष्ट कार्य करेल.   कफजकृमि मध्ये हेतुप्रत्यनिक म्हणून. (तिल, मत्स्यानुपमांसपिष्टान्न.... विरुद्धान्न, गुरु, स्निग्ध, शीत, अभिष्यंदी), अभयारिष्ट उष्ण, लघु, व आहारज हेतुने झालेली अग्निविकृति, रुक्षण गुणाने अभिष्यंदी गुण कमी करेल.   कफज व पुरीषज कृमि: तुल्यसमुत्थान    रक्तज कृमि हेतु अजीर्ण, विरुद्धान्न   कफ दोष हे कृमि उत्पत्तीस महत्वाचे कारण आहे. अभयारिष्ट हे कफहर कार्य करुन कृमीचा विघात करेल (प्रकृतिविघातज चिकित्सा).

15) ग्रंथि   दोष /दुष्य साम्य - त्रिदोष(कफप्राधान्य), मांस, रक्त, मेद   दोष दुष्य ग्रथित होऊन वृत्त, उन्नत शोथ युक्त ग्रंथि निर्माण करतात, अभयारिष्ट कफघ्न कार्य, वरील दुष्याकडे गामीत्व म्हणून, उष्ण, तीक्ष्ण गुणाने हा दोषदुष्य संघात फोडण्याचे कार्य करेल.

16) अर्बुद   दोष /दुष्य साम्य - त्रिदोष(कफप्राधान्य), मांस, रक्त, ग्रंथिवत कार्य   मांसवह स्रोतस दुष्टी लक्षण

17) व्यंग - शोकक्रोधादिमुळे वात-पित्त दोषप्रकोप,रक्तदुष्टी होऊन व्यंग होते. अरिष्टचे रक्त व मनापर्यंत गामीत्व म्हणून मानस हेतुंनी झालेल दोषप्रकोप दुर करेल.  दुष्य / स्थान साम्य (अर्श, व्यंग) : त्वचा, रक्त  रक्तवह स्रोतस दुष्टी लक्षण

18) राजयक्ष्मा - धातुक्षयज यक्ष्मा - मानसहेतु(इर्ष्याभयत्रासक्रोध इ.) ने अग्निमांद्य  विषमाशनजन्य यक्ष्मा - अग्निदुष्टी होऊन उत्तरोत्तर धातुंचे पोषण होत नाही. या दोन्ही अवस्थेत त्या अधिकरणातील औषधींसह अभयारिष्ट वापरावे.  कफाधिक्य, कफप्रसेक असताना शोधन देऊन तत्पश्चात लघु, दीपन गुणाचे अरिष्ट वापरावे. अभयारिष्ट शेष दोषांचे अनुलोमन देखील करेल.  राजयक्ष्मा रुग्णामध्ये मांससेवन करताना अनुपानार्थ अरिष्ट वापरावे (यथार्ह).  मद्य हे उष्ण तीक्ष्ण ,सुक्ष्म, गुणाने यक्ष्मामधील अवरुद्ध झालेले स्रोतोमुखे मोकळी करते, अग्निदीपन करेल त्यामुळे पुढील धातुंचे पोषण व्यवस्थित होते.  रसवह स्रोतस दुष्टी लक्षण

19) ज्वर -  आमाशयस्थ दोषदुष्टी, अग्निमांद्य, आमोत्पत्ती, होऊन पुढे रसवह स्रोतसावरोध...इ होऊन ज्वरोत्पत्ती होते.

उर्वरित मजकूर पान क्र. 47 वर

पान क्र. 43 पासून पूढे

पूर्वरुपावस्था / ज्वर आरंभीची अवस्थेत (सामावस्था), आस्यवैरस्य, बलवर्णहानी असताना, अभयारिष्ट उष्ण,तीक्ष्ण, रुक्ष गुणाने दीपन,पाचन, करुन अग्निवर्धन व तदाश्रित बलवर्ण वर्धन करेल.  वातकफज ज्वर - अग्निमांद्य , अरुचि, मलमूत्रविबंध असताना इतरज्वरघ्न औषधींसह उपयोगी.  नवज्वर मध्ये अनुपानार्थ मद्य देण्याचा उल्लेख

कल्प स्वरुप :

रस - अम्ल, कषाय (अम्ल -आमलकी प्रधान द्रव्य)

वीर्य - उष्ण

विपाक - अम्ल

गुण - लघु,रुक्ष,तीक्ष्ण

थोडक्यात अवस्था :

दोष - प्रधानत: कफवातघ्न

दुष्य - रक्त, मांस, मेद,

मल - पुरीष

स्रोतस - अन्नवह,रसवह,रक्तवह,मांसवह

गामीत्व - अग्नि, त्वचा, मन, महास्रोतस, बाह्य रोगमार्ग

अवस्था - वातवर्चसंग, अग्निमांद्य, स्रोतोरोध (कफावरुद्ध वात - उष्ण, तीक्ष्ण, रुक्षण गुणाने)

- मानसहेतु असताना

- गुरु, स्निग्ध, अभिष्यंदी हेतुंविरुद्ध कार्य

कार्य - अग्निवर्धन, वातवर्चनुलोमन, रुक्षण, बलवर्धन

(अग्निमांद्यजनित), रोचन

वैद्य सागर मगर

(व्याख्याता पंचकर्म, ऱ्िीीीीळपस झह.ऊ )

ऱ्गीळवश - वैद्य ममता नाकाडे

(झह.ऊ. झीेष. कजऊ, ऊशरिीीांशपीं ेष झरपलहरज्ञरीार)